**महाराष्ट्र राज्य तेल बियाणे वाणिज्य आणि औद्योगिक महामंडळ मर्यादित**
**२०१, जॉली भवन २,न्यु मरीन लाईन्स , सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, मुंबई - २०.**
**दूरध्वनी क्र. ०२२-२२६५०१४६, फॅक्स ०२२-२२६१००३६.**

जा.क्र.मोसिकॉल/एच ओ/ऐ से नि यो /२००९-१०/ दिनांक : २२.०३.२०१०

## परिपत्रक

**विषय-** मोसिकॉल कर्मचारी/अधिका-यांना ऐच्छिक सेवा निवृत्ती योजना लागू करणे बाबत.
**संदर्भ-** १. मोसिकॉल संचालक मंडळ सभा क्र.९९ दि.२९.०१.२००८
२. मोसिकॉल पत्र क्र.मोसिकॉल / एच ओ / २००८-०९/३४१ दि.०४.०७.२००८
३. शासन निर्णय क्र.ऑईल-२००८/प्र.क्र.११४/२१ स दि.०२/०३/२०१०.

महाराष्ट्र राज्य तेल बियाणे, वाणिज्य आणि औद्योगिक महामंडळ, मोसिकॉल हया संस्थाचे तेल प्रक्रिया कारखाने आर्थिक दृष्टया वर्धनक्षम नसलेने वर्ष २००० पासून गाळपासाठी बंद आहेत. मोसिकॉलच्या कारखान्याच्या देखरेख, सुरक्षा विभागासाठी लागणारे आवश्यक अधिकारी/कर्मचारी मोसिकॉल येथे ठेवून उर्वरीत कर्मचा-यांची/ अधिका-यांची सेवा पुरेपुर वापरण्यासाठी कापूस पणन महासंघाचे विविध विभागीय कार्यालयात कामांसाठी पाठविले आहे. मोसिकॉलच्या सेवकांच्या पगारावर होणारे खर्च व मोसिकॉलची सदयाची आर्थिक परिस्थितीचा विचार करता मोसिकॉलचे संचालक मंडळाने मोसिकॉलच्या दि.२९.०१.२००८ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेमध्ये ऐच्छिक सेवानिवृत्ती योजना लागू करणेबाबत घेतलेले निर्णयाची मान्यता शासन निर्णय क्र.ऑईल-०८/प्र.क्र.११४/२१स दि. ०२/ ०३/ २०१० जोडपत्र-१ अन्वये दिलेली आहे. सदर शासनाचे मंजूरी नूसार मोसिकॉलचे सेवकांना या कार्यालयीन परिपत्रकान्वये ऐच्छिक सेवा निवृत्ती योजना लागू करण्यात येत आहे.तसेच जे अधिकारी/कर्मचारी या स्वेच्छा निवृत्ती योजनेमध्ये सहभागी होणार नाहीत त्या अधिकारी/कर्मचा-यांना पाचवा वेतन आयोग न लावता कंपनी कायदयाप्रमाणे मोसिकॉलचे वायडींग अप करुन सदर अधिकारी/कर्मचा-यांना कंपनीच्या कायदयाप्रमाणे देय रक्कमा अदा करण्यात येतील. मोसिकॉलचे जे अधिकारी/कर्मचारी ऐच्छिक सेवा निवृत्ती स्विकारणेसाठी आवश्यक अर्ज करतील, फक्त त्या सेवकांना दि.०१.०१.१९९६ पासून शासनाने शासकीय कर्मचा-यांना लागू केलेले पाचव्या वेतन आयोगातील वेतन श्रेणी व अनुषंगीक भत्ते लागू केले जातील. ऐच्छिक सेवानिवृत्ती घेणारे सेवकांना वेतनश्रेणी, वेतन निश्चिती व ०१.०१.१९९६ पासून देय थकबाकी रक्कमेची परीगणना जोडपत्र क्र.२ प्रमाणे करण्यात येईल व ऐच्छिक सेवा निवृत्ती योजना अटी शर्ती व फायदे पुढीलप्रमाणे राहतील.

### <u>योजनेचे फायदे - अटी व शर्ती</u> .

१. ही स्वेच्छानिवृत्ती योजना मोसिकॉलच्या सर्व सेवकांना (ज्यांची सेवा १० वर्ष पूर्ण झाली आहे, अथवा ज्यांचे वय किमान ४० वर्ष आहे.) लागू आहे. तथापि शासकीय आदेशानुसार ही अट शिथील करता येईल.

२. मोसिकॉलचे जे सेवक, ज्यांचे वय ५८ वर्षाचे आत आहे असे सर्व सेवक ऐच्छिक सेवा निवृत्ती योजनचे लाभ घेण्यास पात्र रहातील.

३. सदर पात्रता असलेले जे सेवक संदर्भित योजनेअंतर्गत ऐच्छिक सेवा निवृत्ती स्वीकारतील (नमूना क्र.१ प्रमाणे) त्या सेवकांना १.१.१९९६ पासून पाचव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी लागू करून, वेतन निश्चिती जोड पत्र क्र.२ प्रमाणे करून पूर्ण थकबाकी देय राहिल.

४. या योजनेखाली अर्ज करणा-या सेवकांस पुढील "अ" अथवा "ब" प्रमाणे फायदे देय राहतील.

अ) पात्र सेवकांच्या झालेल्या सेवेचा प्रत्येक वर्षासाठी ३५ दिवसांचा पगार.

**अधिक**

उर्वरित सेवेसाठी (निवृत्तीच्या नियत वयोमान ५८ वर्षापर्यंत) पुढील i ii iii या पर्यायानुसार जी रक्कम जास्त असेल ती रक्कम देय राहिल.

i )रूपये २५००/- उर्वरित सेवेच्या प्रत्येक वर्षासाठी.

ii) उर्वरित सेवेच्या प्रत्येक वर्षासाठी २५ दिवसांचा पगार, परंतु किमान रूपये२५०००/- इतकी रक्कम.

iii) उर्वरित सेवेच्या कालवधी साठी २५० दिवसांचा पगार.

वरील तिन्ही ( i ii iii ) पैकी जी रक्कम जास्त असले ती उर्वरित सेवेकरीता फायदा देय राहिल.

**अथवा**

ब) सेवानिवृत्ती पर्यंतच्या शिल्लक सेवेच्या कालावधीचे एकूण महिने x दरमहा एकूण पगार (मूळ वेतन + महागाई वेतन + महागाई भत्ता + घरभाडे भत्ता)

**(वरील "अ" आणि "ब" या पैकी जी रक्कम कमी असेल ती देय राहिल.)**

५. स्वेच्छा निवृत्ती पोटी वरील क्र.४ प्रमाणे येणारी एकूण देय रक्कम ही त्या सेवकाच्या स्वेच्छा निवृत्ती पासून नियत वयोमान ५८ वर्षा पर्यंतच्या उर्वरित सेवेच्या (दिवस) वरील प्रमाणे येणा-या रक्कमेपेक्षा जास्त असणार नाही.

**<u>उदा.</u> (१)** वरील प्रमाणे झालेल्या सेवेपोटी व उर्वरित सेवेपोटी देय रक्कम ही १००० दिवसाची होत असेल परंतू त्याची उर्वरित सेवा १३५० दिवस असेल तर त्या सेवकास १००० दिवसांचा पगार मिळेल.

**अथवा**

वरीलप्रमाणे झालेल्या सेवेपोटी व उर्वरित सेवेपोटी देय रक्कम ही १३५० दिवसांची होत असेल, परंतु त्याची उर्वरित सेवा १००० दिवस असेल तर त्या सेवकास १००० दिवसांचा पगार मिळेल.

**उदा.**(२) ज्या कर्मचा-यांनी २४ वर्षाची सेवा पूर्ण केलेली आहे व उर्वरित सेवा १ वर्ष शिल्लक आहे अशा सेवकांना स्वेच्छा निवृत्तीचा लाभ खालील प्रमाणे देय राहील.
झालेल्या सेवेस प्रतीवर्ष ३५ दिवस प्रमाणे (३५ दिवस x २४ वर्ष) ८४० दिवस आणि उर्वरित कालवधी करिता (१ वर्षा करिता) २५० दिवस असे एकूण १०९० दिवसांचे पगार न देता सेवानिवृत्ती करीता शिल्लक राहिलेल्या १ वर्षाचे पगारची रक्कम देय राहिल. (पगार म्हणजे मूळ पगार + महागाई वेतन + महागाई भत्ता + घरभाडे भत्ता या प्रमाणे होणा-या पगाराची रक्कम देय राहील. )

**उदा.**(३) ज्या कर्मचा-याची २० वर्ष सेवा झालेली आहे व उर्वरित सेवा १५ वर्ष शिल्लक आहे अशा कर्मचा-याला खालील प्रमाणे स्वेच्छा निवृत्तीचा लाभ मिळेल.

झालेल्या सेवेकरीता प्रतीवर्ष ३५ दिवस या प्रमाणे (३५ दिवस x २० वर्ष) = ७०० दिवस व १५ वर्ष उर्वरित कालावधीकरिता प्रती वर्ष २५ या प्रमाणे (२५ दिवस x १५ वर्ष) = ३७५ दिवस या प्रमाणे परिगणना करून एकूण १०७५ दिवसांची रक्कम देय राहिल. उर्वरित कालावधी १५ वर्ष असल्याने १५ x १२ x ३० = ५४०० दिवसांचा पगार यामध्ये १०७५ दिवस कमी असल्याने तेवढयाच कालावधीचा पगार देय राहिल.

६. भरपाई रक्कमेची परीगणना करताना एका दिवसाचा पगार म्हणजे ही योजना लागू करतेवेळीच्या मूळ वेतन, महागाई वेतन अधिक महागाई भत्ता व घर भाडे भत्ता यांच्या एकूण रक्कमेला ३० (दिवस) ने भागून येणारी रक्कम जवळच्या रुपयापर्यंत धरण्यात येईल.

७. मोसिकॉल मध्ये झालेली सेवा म्हणजे मोसिकॉलच्या सेवेत रूजु झालेल्या तारखेपासून सततपणे या स्वेच्छा निवृत्ती योजनेअतंर्गत सेवामुक्त करेपर्यंतचा एकूण कालावधी विचारात घेतला जाईल (पूर्ण वर्ष म्हणजे ६ महिने किंवा त्यापेक्षा जास्त सेवा झाली असेल तर ते वर्ष पूर्ण समजण्यात येईल व ६ महिन्या पेक्षा कमी विचारात घेतला जाणार नाही.)

८. **सदर योजनेच्या अंतर्गत स्वेच्छा निवृत्ती अर्ज दि. २९.०३.२०१० पर्यत कार्यालयीन वेळेत करावयाचा आहे.** या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणा-यांनी सदर मुदतीत विभाग प्रमुखा मार्फत अर्ज सहपत्रासह करावा.

९. या योजनेखाली स्वेच्छा निवृत्ती स्विकारणा-या सेवकाला स्वेच्छा निवृत्ती पोटी देय रक्कम सेवा मुक्त तारखेपासून ४५ दिवसांच्या आत अदा करण्यात येईल. तथापि कालावधी कमी /वाढविण्याचा अधिकार व्यवस्थापनाचा राहील.

१०. स्वेच्छा निवृत्ती पोटी देय असलेल्या रक्कमेमधून कर्मचा-या कडून मोसिकॉलला काही घेणेअसल्यास अथवा कर्जाऊ रक्कम किंवा इतर कोणतीही रक्कम त्यांचेकडे निघत असल्यास अशी मोसिकॉलची व सर्व इतर येणी कपात करून घेण्याचा अधिकार मोसिकॉलला राहिल.

११.स्वेच्छा निवृत्ती घेताना सेवा निवृत्तीच्या नियमाप्रमाणे मिळणारी ग्रॅच्युईटी, प्रा.फंड, शिल्लक अर्जित रजेचा पगार इत्यादी सर्व फायदे सेवकांस मिळतील.

१२.सदर योजनेचा फायदा घेणा-या कर्मचा-यांनी नॉमिनेशन / वारसांच्या नावाचा तपशील फॉर्म भरून दयावा लागेल व एखादया कर्मचा-यांची रक्कम पूर्ण मिळण्या आधि मृत्यू झाल्यास त्याची देय रक्कम त्यांचे वारसास /नॉमिनेशन प्रमाणे देण्यात येईल.वारसाचे नाव सेवानिवृत्तीच्या अर्जासोबत दिलेल्या नमून्यात सादर करावे.

१३.स्वेच्छा निवृत्ती घेतलेले कर्मचारी कोणत्याही कारणास्तव परत मोसिकॉलच्या सेवेत कोणत्याही पदावर नियुक्त होण्यास अपात्र राहील.

१४.स्वेच्छा निवृत्ती घेतलेल्या सेवकांना मोसिकॉलशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणत्याही प्रकारचा व्यवहार / व्यवसाय करता येणार नाही. यासाठी रूपये ५०/- मुद्रांकावर लिहून देणे बंधन कारक राहील.

१५.जे कर्मचारी इतर संस्थेवर प्रतिनियुक्तीवर किंवा असाधारण विशेष रजांवर असतील त्यांना या योजनेचा फायदा घ्यावयाचा असेल तर त्यांना प्रथम मोसिकॉलच्या सेवेत परत यावे लागेल व त्यानंतर त्यांना रीतसर अर्ज करून या योजनेचा फायदा घेता येईल.

१६. जर एखादया सेवकांने मोसिकॉलचे विरूध्द गैरकृत्य केलेले आहे असे निदर्शनास आले तर या स्वेच्छा निवृत्ती योजने अतंर्गत मिळणारे फायदे रोखून ठेवण्याचा अधिकार मोसिकॉलला राहील.

१७. स्वेच्छा निवृत्तीमुळे रिक्त झालेल्या जागेवर नवीन सेवक भरती करता येणार नाही तसेच स्वेच्छा निवृत्ती स्विकारलेल्या सेवकास त्या व्यवस्थापनाच्या अधिपत्याखाली असलेल्या इतर कोणत्याही संस्थेत नोकरीस राहता येणार नाही.

१८. या योजनेचा फायदा घेणा-या सेवकांना कोणत्याही न्यायालयात मोसिकॉलच्या विरोधात कोणत्याही प्रकारचे दावे दाखल करता येणार नाहित.तसेच ज्या सेवकाने मोसीकॉलच्या विरोधात व्यक्तिशः न्यायालयात दावा दाखल केलेला असेल त्यांनी स्वेच्छा निवृत्तीचे अर्ज करताना प्रलंबित असलेल्या सर्व न्यायालयातील न्यायालयीन दावे बिनशर्त मागे घेणे बाबत आवश्यक अर्ज संबंधित न्यायालयात करून न्यायालयीन प्रकरण मागे घ्यावे लागेल.

१९.सोबत जोडलेल्या विहीत नमून्यात अर्ज करावयाचा असून खालीलप्रमाणे संबंधीत अधिका-यामार्फत सादर करावयाचा आहे.

| **अ.क्र** | **सेवकांचे कार्यरत ठिकाण** | **ऐच्छिक सेवानिवृत्ती अर्ज कोणाकडे सादर करावयाचे** |
|---|---|---|
| अ | मोसिकॉल मुंबई | मुबंई कार्यालयात कार्यरत असलेले सर्व सेवक त्यांचे अर्ज वरीष्ठ पणन व्यवस्थापक यांचे कडे सादर करतील. |
| ब | मोसिकॉल कारखाने गंगाखेड , हिंगोली, परभणी , अमरावती | मोसिकॉल कारखान्यात कार्यरत असलेले सर्व सेवक त्यांचे अर्ज संबंधीत कारखाना व्यवस्थापक यांचे कडे सादर करतील. |
| क | कापूस पणन महासंघाचे विभागीय कार्यालय/प्रधान कार्यालय | कापूस पणन महासंघाचे विभागीय कार्यालय/प्रधान कार्यालयात कार्यरत असलेले सर्व सेवक त्यांचे अर्ज संबंधीत कार्यालयप्रमुखा मार्फत त्यांचे अर्ज सादर करतील. |

२०. प्राप्त अर्ज संबंधीत विभाग प्रमुखाने वरीष्ठ पणन व्यवस्थापक,मोसिकॉल,२०१,जॉली भवन नं.२, मुंबई-२० येथे दि.३०.३.२०१०रोजी सकाळी ११.००वाजेपर्यन्त विशेष दुतामार्फत पाठवावयाचे आहेत.

२१. आयकराची कपात आयकर कायदयातील प्रचलीत तरतुदीनुसार करण्यात येईल.

२२.स्वेच्छा निवृत्ती मजूंर करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना राहतील.

सदरचे परिपत्रक सर्व सेवकांच्या निदर्शनास आणण्यात यावे.

सह व्यवस्थापकीय संचालक

प्रत-

१. सरव्यवस्थापक(सर्व )कापूस पणन महासंघ.
२. वरीष्ठ पणन व्यवस्थापक, मोसिकॉल
३. उपसरव्यवस्थापक(सर्व )कापूस पणन महासंघ
४. कारखाना व्यवस्थापक (सर्व) मोसिकॉल
५. विभागीय व्यवस्थापक (सर्व) कापूस पणन महासंघ
६. सूचना फलक (सर्व कार्यालय ) मोसिकॉल/ कापूस पणन महासंघ
७. कार्यालयीन नस्ती.

(भाग -१)
(ऐच्छिक सेवानिवृत्तीकरीता सेवकांची  भरावयाची माहिती)
(मोसिकॉल कार्यालयाने भरावयाची माहिती)

१. सेवक / अधिका-याचे नाव :

२. हुददा :

३. प्रॉव्हीडंट फंड कोड नंबर :

४. जन्मतारीख :

५. सध्या कार्यरत असलेल्या
कार्यालयाचे/ विभागाचे नाव :

६. दिनांक ------------------ रोजी वय : वर्ष महिने दिवस

७. संस्थेतील रुजू झाल्याची तारीख :

८. नियत वयोमानाप्रमाणे सेवानिवृत्तीची तारिख :
( तारिख उदा.जन्म-३.३.१९५२ सेवानिवृत्ती तारीख-२.३.२०१०)

९. दिनांक ----------------रोजी संस्थेतील सेवाकालावधी : वर्ष महिने दिवस

१०. दिनांक ------------ नंतर सेवानिवृत्त वर्ष महिने दिवस
होण्यास शिल्लक सेवाकालावधी :

११. माहे -------------- चे वेतन
अ.मूळ पगार
ब.महागाई वेतन
क.महागाई भत्ता
ड.घरभाडे भत्ता
एकूण

१२. सेवाकाळात घेतलेल्या कर्जाबाबतची माहिती :
(गृहकर्ज / वाहनकर्ज/पतसंस्था / बँक कर्ज दिनांक --------------- अखेर बाकी असलेल्या रक्मेची माहिती )

| अ.क्र | बँकेचे नाव/ कर्ज /अग्रीम तपशील | शिल्लक रक्कम |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

१३. प्रलंबित खातेचौकशी व कोर्टकेसबाबतची माहिती :
अ. खाते चौकशी : आहे / नाही
असल्यास तपशील
ब. कोर्ट केस : आहे / नाही
असल्यास तपशील

कार्यालय प्रमुख

प्रतिज्ञा पत्र (भाग-२)

मी ---------------------------------------------------------- प्रमाणित करते / करतो की,

अ.महाराष्ट्र राज्य तेल बियाणे वाणिज्य आणि औदयोगिक महामंडळ मर्यादित या संस्थेमध्ये परिपत्रक क्र ------------------------------------------- दिनांक-------------------------- नुसार लागू करण्यात आलेल्या स्वेच्छानिवृत्ती योजनेतील सर्व अटी व शर्ती कोणत्याही प्रकारची अट न ठेवता व बदल न करता मला मान्य आहेत.

ब. मी या अर्जाद्वारे महाराष्ट्र राज्य तेल बियाणे वाणिज्य आणि औदयोगिक महामंडळ मर्यादित या संस्थेला माझेवर असलेल्या सर्व कर्ज / येणे बाकी यांची वसुली करण्याचे हक्क देत आहे.

क.मी लिहून देतो की माझे निवासस्थान माझ्या कर्तव्यस्थानाच्या कार्यालयापासून एक किलोमीटर पेक्षा जास्त लांब आहे.

ड. मी लिहून देतो की चुकीच्या वेतन निश्चितीमध्ये किंवा वेतन निश्चितीमध्ये विसंगती आढळून आल्यामुळे मला अति प्रदान झाल्याचे निर्दशनास आल्यास ते भविष्यात मी मोसिकॉलला परत करीन.

इ. वरील माहिती खोटी / चुकीची आढळल्यास मला देण्यात आलेल्या रक्कमेची वसूली करण्याचे अधिकार मी महाराष्ट्र राज्य तेल बियाणे वाणिज्य आणि औदयोगिक महामंडळ मर्यादित या संस्थेस देत आहे.

स्वाक्षरी-

नाव व पद -

ठिकाण -

दिनांक-

(संबंधित विभागासाठी)

अ. श्री. / श्रीमती ------------------------------- याचेवर विभागीय खाते चौकशी आहे / खाते चौकशी नाही.

विभाग प्रमुख

ब. श्री. / श्रीमती ------------------------------- याचेवर कोर्ट केस आहे / कोर्ट केस नाही.

विभाग प्रमुख

क. श्री. / श्रीमती ------------------------------ याचेवर आज रोजी ---------------------------या संस्थेचे कर्ज रूपये ----------------------आहे / कर्ज नाही.

------------------------------

विभाग प्रमुख

करीता सदरचा स्वेच्छानिवृत्तीचा अर्ज मंजूरीसाठी परिपत्रकातील अटीनुसार शिफारस करण्यात येत आहे.

विभाग प्रमुख

श्री./श्रीमती ---------------------------------यांचा स्वेच्छानिवृत्तीचा अर्ज परिपत्रकातील अटीनुसार मंजूर करणेची शिफारस करीत आहे.

ठिकाण- विभाग प्रमुख सही-

दिनांक- नाव व हुद्दा-

प्रेषक -
नाव -
हुद्दा -
विभाग -
दिनांक -

प्रति,
मा. व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र राज्य तेल बियाणे वाणिज्य आणि औदयोगिक महामंडळ मर्यादित,
जॉली भवन नं.२, मुबंई-२०.

विषय - न्यायालयातील प्रलंबित दावे / खटले / याचिकेबाबत.

महोदय,

मी ------------------------------------- पदनाम------------------विभाग--------------आपणास कळवू इच्छितो की, मी माझ्या स्वेच्छा निवृत्तीचा अर्ज दिनांक ---------------- आपल्या मंजूरी करिता सादर केलेला आहे. सदर अर्ज मंजूर झाल्यास मी असे जाहिर करतो की , आमच्या युनियनने प्रातिनिधिक स्वरूपात --------- न्यायालयात दावा क्र.--------------------- ची तक्रार / अर्ज केलेली / केलेला आहे. सदर प्रकरणात न्यायालयात प्रलंबित असून या प्रकरणामध्ये अदयाप मान्यायालयाचे अंतीम आदेश प्राप्त झालेले नाहीत. या प्रकरणात न्यायालयाचे आदेशानुसार माझ्याकडून मोसिकॉलला जर काही रक्कम देय होत असेल तर अशा देय रक्कमेपोटी मी रूपये इतकी रक्कम रोखीने बिना व्याजी अनामत म्हणून ठेवत आहे. मे न्यायालयाच्या (अपीत न्यायालयाच्या) आदेशानुसार माझ्याकडून मोसीकॉलला देय रक्कम निघाल्यास वरील अनामत रक्कम महासंघाने सदर देय रकमेपोटी समायोजित करण्यात माझी कोणतीही हरकत नाही. या रकमेपेक्षा काही जास्त रक्कम देय असल्यास ती मी स्वतंत्रपणे देण्यास तयार आहे. तसेच सदर प्रकरणामध्ये न्यायालयीन आदेशानुसार माझ्याकडून कोणतीही रक्कम वसूल न करण्याचे आदेश दिले गेल्यास मी मोसिकॉलकडे ठेवलेली वरील अनामत रक्कम मोसिकॉलने मला न्यायालयीन निकालाच्या तारखेनंतर (अपील केले असल्यास अपीलाच्या निकालानंतर) ३० दिवसाचे आत मूळ रक्कम परत करावयाची आहे.

वरील सहमती मी स्वखुशीने व विचारपूर्वक दिली आहे.
कळावे,

आपला विश्वासू,

स्वाक्षरी-
सेवकाचे नाव-
पद-

साक्षीदार -
स्वाक्षरी-
नाव-
पद-

मोसिकॉल

<u>नॉमीनेशन / वारसदारांच्या नावांचा तपशील</u>

१) याद्वारे नमूद करतो की, माझ्या मृत्यूनंतर स्वेच्छा निवृत्ती वेतनांतर्गत मिळणारे फायदे माझी पत्नी / मुले यांना देण्यात यावेत.

| अ.क्र. | कुटुंबातील सभासदांचे नाव | पत्ता | जन्मतारीख | असलेले नाते |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

२) मी प्रमाणित करतो / करते की, निवृत्ती वेतन योजना १९९५ च्या परिच्छेद २(७) मध्ये दिलेल्या कुटुंबाच्या व्याख्येनुसार माझे कुटुंब अस्तित्वात नाही व यानंतर माझे तसे कुटुंब जर अस्तित्तवात आले तर वरील नमुन्यात मी त्याचा तपशील देईन.

३) मी याद्वारे असे नमूद करतो / करते की, स्वेच्छानिवृत्ती देय रक्कम माझ्या मृत्यूनंतर माझ्या कुटुंबातील खालील नामनिर्देशित केलेल्या व्यक्तिस देण्यात यावे / देय राहील.

| अ.क्र. | नामनिर्देशित व्यक्तिचे नाव पत्ता | जन्मतारीख | असलेले नाते |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

दिनांक :-

अनावश्यक मजकूर खोडून टाका.

अर्जदाराची सही अथवा अंगठयाचा ठसा.

अर्जदाराचे नाव-

**नमुना क्र.-१**

**मोसिकॉल**

**मोसिकॉल कर्मचा-यांकरीता**
**स्वेच्छा निवृत्ती स्विकारणेकरीता करावयाचा अर्ज**

प्रेषक -

नाव -

हुद्या -

विभाग - ठिकाण -

मा.व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र राज्य तेलबियाणे वाणिज्य आणि औद्योगिक महामंडळ मर्या.
मुंबई २०.

मार्फत वरीष्ठ पणन व्यवस्थापक /कारखाना व्यवस्थापक / कार्यालय प्रमुख.

महोदय,
१) मी ...................................................... हुद्या ..................... कार्यरत विभाग ..................... या अर्जाद्वारे मोसिकॉलने कार्यालयीन आदेश क्र.मोसिकॉल / एचओ / ऐसिनी /२००९-१०/ दि. ............ अन्वये लागू केलेल्या स्वेच्छा निवृत्ती योजनेच्या अंतर्गत नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती यांना अधिन राहून लाभ घेऊ इच्छित आहे.

२) संदर्भिय परीपत्रकात असलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य असून कोणत्याही प्रकारची अट न ठेवता व त्यात कोणताही बदल न करता मी लाभ घेऊ इच्छिते / इच्छितो.

३) सदर स्वेच्छा निवृत्ती योजनेचा लाभ घेण्यासाठी मी आज दिनांक ............... रोजी सह पत्रासह माझा अर्ज सादर करीत आहे.

करीता मला स्वेच्छा निवृत्ती मंजूर करावी, ही विनंती.
कळावे.

आपला विश्‍वासू,

स्वाक्षरी-
हुद्या -
कार्यरत ठिकाण -

दिनांक -
पत्रव्यहाराचा पत्ता -

फोन नं.
सहपत्र
परीशिष्ठ (भाग २), नॉमिनेशन / वारसांच्या नावाचा तपशील, प्रलंबित याचिके बाबत संमती पत्र, प्रतिज्ञा पत्र.

==========================================================================================

**मार्फत**

**(विभाग प्रमुख ..................................................... कार्यालय)**

**श्री / श्रीमती ................................................ यांचा स्वेच्छा निवृत्तीचा अर्ज या कार्यालयास दिनांक ................ रोजी प्राप्त झाला असून सदरचा अर्ज पुढील कार्यवाहीसाठी .......... .......... कडे पाठविण्यात येत आहे.**

**ठिकाण -**
**दिनांक -**

**विभाग प्रमुख**
**(नाव व हुद्या)**